महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव
GOVERNMENT MEDICAL COLLEGE & HOSPITAL, DHARASHIV
कोविड-१९ इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) ४१३ ५०१
E-Mail: deangmcosmanabad@gmail.com



जा.क्र./शावैमवरुधा/यंत्र.भांडार/रा.यो./दरपत्रके/ 2242 /२०२६ दिनांक: 30/10/२०२६

प्रति,

---

---

---.

विषय: - राज्य योजनेत्तर योजना (नॉन-प्लॅन) सन २०२६-२७ करिता मंजूर निधीतून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे अत्यंत तातडीची व महत्त्वाची रुग्णसेवा विचारात घेऊन रुग्णालयामध्ये अग्निशमन नळकांडे पुनर्भरणा खरेदी करणे कामी दरपत्रके प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ: - दिनांक ३०/०६/२०२६ रोजीची मंजुर कार्यालयीन टिप्पणी.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे अत्यंत तातडीची व महत्त्वाची रुग्णसेवा विचारात घेऊन रुग्णालयामध्ये अग्निशमन नळकांडे पुनर्भरणा खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी विषयांकित काम करणेकामी इच्छुक पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. करिता पात्र पुरवठादारांनी दि. 30/10 /२०२६ ते दि. ०५ / 11 /२०२६ पर्यंत दरपत्रकातील विहित अटी व शर्तींना अनुसरुन खालील नमुद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सिलबंद लिफाफा मध्ये आपले दरपत्रक सादर करावे.

(डॉ.शैलेंद्र द. चौहान)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
व रुग्णालय, धाराशिव.

प्रत : - १) सुचना फलक जाहीर नोटिस, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव.
२) संकेतस्थळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव.

**कार्यालयाचा पत्ता**

**अधिष्ठाता,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व**
**रुग्णालय, जिल्हा सामान्य रुग्णालय**
**आवार, धाराशिव-४१३ ५०१**

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव

## दरपत्रक नोटिस

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे अत्यंत तातडीची व महत्त्वाची रुग्णसेवा विचारात घेऊन खालील प्रमाणे रुग्णालयामध्ये अग्निशमन नळकांडे पुनर्भरणा खरेदीकरिता कामी पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत असुन दि. ३० /१० /२०२६ ते दि. ०५/११ /२०२६ पर्यंत इच्छुक पुरवठादारांनी अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे कार्यालयीन वेळेत सिलबंद लिफाफा मध्ये आपले दरपत्रक करार सादर करावेत.

**दरपत्रके सादर करतेवेळी अधिकृत लेटरहेड वर खालील प्रमाणे विहित नमुन्यात तसेच अटी व शर्तींना अनुसरुनच माहिती सादर करावी अन्यथा निविदा प्रक्रियेतुन अपात्र करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

| अ.क्र. | साधनसामग्रीचे नाव | दर प्रति नग (सर्व करांसहित) |
|---|---|---|
| १) | Refilling of ABC Type Fire Extinguishers - ६ kg | |
| २) | Refilling of CO2 Type Fire Extinguishers - ४.५ kg | |

**अटी व शर्ती:**

०१) दरपत्रक मोहरबंद लिफाफा दिनांक ०५ /११ /२०२६ पर्यंत सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावेत. जाहिर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत/ ग्राह्य धरले जाणार नाहीत.

०२) सुचना फलक/ संकेतस्थळावरील जाहिर नोटीस प्रमाणे इच्छुक कंपनीस/पुरवठादारास दरपत्रक मोहरबंद लिफाफा सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे. दरपत्रक मोहरबंद लिफाफा "अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव" यांचे नावे विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा.

०३) दरपत्रक मोहरबंद लिफाफ्यावर **"शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे रुग्णसेवेच्या अनुषंगाने अत्यावश्यक रुग्णालयामध्ये अग्निशमन नळकांडे पुनर्भरणा खरेदीकरिता दरपत्रके"** तसेच मोहरबंद लिफाफा जमा करण्याचा **अंतिम दिनांक** दरपत्रधारकाच्या नावाचा **शिक्का** इत्यादी नमुद असणे आवश्यक आहे.

०४) दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात सादर करावयाचे दस्तऐवज: (Document) **जीएसटी (GST) क्रमांक असलेल्या अधिकृत लेटरहेडवर** दरपत्रक सादर करावे. त्यासोबत (१) जीएसटी प्राधिकृत प्रत, (२) पॅन कार्डची छायांकित प्रत, (३) शॉप ॲक्ट, (४)उद्यम आधार, (५)आधार कार्ड, (६)एकल दरपत्रक धारक असल्याबाबतचे हमीपत्र (सोबत नमुना जोडला आहे) "ANNEXURE-A" (०६) सदर कामाकरिता आवश्यक शासकीय परवाने इ. कागदपत्रे जोडण्यात यावीत.

०५) पूरवठाधारकास आगाऊ रक्कम (ADVANCE PAYMENT) अदा करण्यात येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीमुळे देयक अदा करण्यास झालेल्या विलंबापोटी कोणत्याही स्वरुपाचे व्याज अथवा अतिरिक्त शुल्क/ रक्कम हे कार्यालय अदा करणार नाही. तसेच अशा प्रकारची कोणतीही मागणी मान्य करता येणार नाही.

०६) सर्वात कमी दर सादर करणाऱ्या पात्र दरपत्रकदाराचे दर हे पुढील ०६ महिन्यांकरिता गोठविण्यांत येतील. कार्यालयाच्या आवश्यकतेनूसार पुरवठा आदेश निर्गमीत झाल्यापासुन वेळोवेळी त्याच दराने सामुग्री विहित वेळेत (१५ दिवसात) पूरवठा करणे बंधनकारक राहिल.

०७) अपवादात्क परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटी अथवा शर्तीमध्ये आवश्यकतेनुसार अंशत: बदल करणे अथवा प्राप्त झालेली दरपत्रके कोणतेही कारण/पुर्वसुचना न देता नाकारणे तसेच कोणत्याही स्तरावर निविदा प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता) यांनी राखुन ठेवलेले आहेत.

नोंद:- **सदर दर पत्रके मा.अधिष्ठाता यांचे दालनात उघडण्याची वेळ दि. ०६/ ११ /२०२६ रोजी ११.३० वाजता राहिल. सदर नियोजित वेळेत कोणताही बदल झाल्यास निविदाधारकांना तशी पुर्वसुचना देण्यात येईल.**

(डॉ.शैलेंद्र द. चौहान)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
व रुग्णालय, धाराशिव.

**ANNEXURE-A**

## एकल दरपत्रक अधिकृत विक्रेता/पुरवठादार/कंपनी यांचे लेटरहेड

Letter No. Date :-

प्रति
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
व रुग्णालय, धाराशिव.

विषय :- एकल दरपत्रक सादर करणेसंबंधीचे हमीपत्र सादर करणेबाबत...

संदर्भ :- आपले दरपत्रक मागणी पत्र
क्रमांक. _____
दिनांक _____

महोदय

संदर्भांकित दरपत्रक मागणी पत्रानुसार मागणी करण्यात आलेले एकल दरपत्रक सादर करण्यासंबंधीचे हमीपत्र मी खालील प्रमाणे सादर करीत आहे.

## हमीपत्र (Undertaking)

याद्वारे हमी देतो की, दरपत्रक प्रक्रियेसाठी एकच दरपत्रक सादर करीत आहे. आमच्याच फर्मशी निगडीत असलेल्या कुठल्याही व्यक्तीच्या नावे किंवा अप्रत्यक्षपणे केवळ आम्हास लाभ होईल, अश्याप्रकारे दुसरे दरपत्रक दरपत्रकप्रक्रियेमध्ये सादर केलेला नाही. तसेच माझा/आमचा आपल्या कार्यालयातील खरेदी प्राधिकाऱ्यांशी कुठलेही हितसंबंध नाही.

उक्त बाब भविष्यात असत्य/खोटी आढळुन आल्यास, सर्वस्वी जबाबदारी आमची राहील. नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस मी/आम्ही पात्र असू. तद्संबंधी माझी/आमची कुठलीही हरकत राहणार नाही. अशी याद्वारे हमी देत आहे.

अधिकृत व्यक्तिचे नाव व स्वाक्षरी,
शिक्का अणि मोहर
Authorized Person Name,
Signature
with Stamp and Seal